महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७३ | किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

१६६२ : शिवरायांनी तळकोकण काबीज केले.
१८८२ : वा.म.जोशी यांचा जन्मदिन.
१८९४ : कवी माधव ज्युलियन यांचा जन्मदिन.
१९२४ : रशियन राज्यक्रांतीचा जनक लेनिन यांचे निधन.
१९४५ : रासबिहारी बोस यांचे निधन.

| सेन्सेक्स | ८२,१८०.४७ | -१,०६५.७१(१.२८%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९१.०२ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | १६ |
| दिल्ली | २३ | १० |
| मुंबई | ३४ | १८ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३० | १० |

**सुविचार**

सूर्याची पहिली किरण आपल्याला प्रेरणा देते - उजळ भविष्याच्या दिशेने वाटचाल करा

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-७:०७ | संध्या-६:११ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५२,२२५/- | ३,२०,०००/- |

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# मुंबईच्या महापौरपदासाठी दिल्लीत खल, सर्वोच्च पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार?

## महायुतीला ११८ जागांवर यश मिळाल्याने सुरू आहे रस्सीखेच

वृत्तसंस्था । मुंबई



**येथील महापालिकेचा महापौर कोण बनणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या जिंकून आलेल्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवलं होतं. त्यामुळे हॉटेल पॉलिटिक्सला वेग आला होता. एकनाथ शिंदे हे मुंबईच्या महापौर पदासाठी आग्रही असल्याची माहिती आहे. तर दुसरीकडे भाजपला हा मुंबईत सर्वाधिक जागा जिंकून एक नंबरचा पक्ष ठरला आहे. पण भाजपला बहुमत मिळवता आलेला नाही. असं असलं तरी भाजप आणि शिवसेनेच्या महायुतीला ११८ जागांवर यश मिळालं आहे. दोन्ही पक्षांमध्ये आता महापौर पदासाठी रस्सीखेच सुरु आहे. शिंदेंकडून भाजपवर महापौर पदासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याची चर्चा आहे. यानंतर आता दिल्लीतून महत्त्वाची घडामोड समोर येत आहे.**

राज्यातील भाजप नेत्यांची आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांची आज दिल्लीत बैठक होणार आहे. शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे, खासदार श्रीकांत शिंदे, श्रीरंग बारणे यांची भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम आणि आशिष शेलार यांच्यासोबत बैठक होणार आहे. महापौर पद, स्थायी समिती तसेच सुधार समिती, आरोग्य आणि शिक्षण समितीच्या वाटाघाटीवरही चर्चा होणार असल्याची माहिती आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपने १३७ जागांवर तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने ९० जागांवर निवडणूक लढली. या निवडणुकीत भाजपला तब्बल ८९ जागांवर यश आलं. तर शिंदेंना ९० पैकी केवळ २९ जागांवर यश मिळालं. असं असलं तरी एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून महापौर पदावर दावा केला जात असल्याची चर्चा आहे.

एकनाथ शिंदे यांच्या या भूमिकेची राज्यातील भाजप नेत्यांनी पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रार केल्याचं वृत्त एका वृत्त वाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे.एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेमुळे मुंबईत भाजपचं नुकसान झालं. त्यांनी जास्त जागा लढल्यामुळे महायुतीच्या स्टाईक रेटवर परिणाम झाला. भाजपने जास्त जागांवर निवडणूक लढवली असती तर १०० पेक्षा जास्त जागा निवडून आल्या असत्या, असं भाजप नेत्यांचं म्हणणं असल्याची माहिती आहे. तसेच शिंदेंच्या हॉटेल पॉलिटिक्सवरही भाजप नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे.

**➤ भाजपला महापौर पदासाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची मदतीची आवश्यकता आहे. यामुळे एकनाथ शिंदे यांच्याकडून दबावतंत्राचा वापर करुन अडीच वर्षे महापौर पदाची मागणी करण्यात आल्याची चर्चा आहे. तसेच शिंदेंनी भाजपकडे स्थायी बेस्ट समितीत योग्य वाटा मागितल्याच्या देखील चर्चा आहेत. असं असलं तरी भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने भाजपचाच महापौर होईल, असं मित्रपक्षांना सांगण्याची सूचना राज्यातील भाजप नेत्यांना दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर आता दोन्ही पक्षांच्या नेत्यांची दिल्लीत बैठक पार पडणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.**

# कुपोषणामुळे होणारे मृत्यू रोखण्यात सरकार अपयशी

वृत्तसंस्था । मुंबई

**• उपाययोजनांवर चर्चा नको, ठोस कार्यवाही करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश**

**मेळघाटच्या आदिवासी भागात सातत्याने होणारे बाल आणि माता मृत्यू रोखण्यात राज्य सरकार अपयशी ठरत असल्याचे उच्च न्यायालयाने सोमवारी सुनावले. तसेच, आरोग्य सेवांची उपलब्धता, पायाभूत सुविधा आणि पूर्वीच्या समिती अहवालांच्या अंमलबजावणीचा समावेश असलेला एक सर्वसमावेशक कृती आराखडा चार आठवड्यांत सादर करण्याचे आदेश दिले. हे आदेश देताना आम्हाला उपाययोजनांवर चर्चा नको आहेत, तर त्यावरील ठोस कार्यवाही हवी आहे, असेही न्यायालयाने सरकारला बजावले.**



कुपोषणामुळे १५ नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी चार मुलांचा मृत्यू झाला. तसेच वर्षभरात बालमृत्यूंची वास्तविक संख्या १३६ असून ती राज्याने सादर केलेल्या आकडेवारीपेक्षा (११५) जास्त असल्याचे याचिकाकर्त्यांच्यावतीने वकील जुगल गिल्डा यांनी न्यायालयाला सांगितले. त्यांनी खराब रस्ते, अनियमित वीजपुरवठा आणि दुर्गम प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सेवा करण्यास इच्छुक नसलेल्या अननुभवी डॉक्टरांच्या नियुक्तीकडेही लक्ष वेधले. या मुद्यांची न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती (पान २ वर)

न्यायालयाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या स्त्रीरोगतज्ज्ञ आणि बालरोगतज्ज्ञांना दुर्गम भागांतील प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतचा लांब आणि खडतर प्रवास करण्यासाठी दररोज वेळापत्रक तयार करण्याच्या पद्धतीवरही टीका केली. तसेच या पद्धतीला प्रभावहीन व निराशाजनक म्हटले. हे प्रकरण जनहित याचिकेतून उभे राहिले आहे. हा काही प्रतिपक्षाचा खटला नाही, असेही न्यायालयाने ठोस उपाययोजना केल्या जात नसल्यावरून सरकारला सुनावले. विशेषतज्ज्ञांना लांबच्या खडतर प्रवासाचे दररोजे वेळापत्रक तयार करण्यास सांगण्याऐवजी सरकारला कुठेतरी विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यानुसार, आदिवासी भागात काम करणाऱ्या डॉक्टरांना अतिरिक्त वेतनवाढ द्या, मासिक आधारावर डॉक्टरांची नियुक्ती करा आणि त्यांना रुग्णांवर त्वरित उपचारांसाठी उपलब्ध ठेवा, असे न्यायालयाने सुचवले.

## थोडक्यात

### दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका; ३५ लाख नोकऱ्यांचा मार्ग मोकळा

**बर्न ।** वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या दावोस परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीचे दमदार दर्शन घडवलेय. विदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हेच देशाचे खरे गेटवे असल्याचे सांगत त्यांनी तब्बल ३५ लाख रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याचे जाहीर केले. नवी मुंबई विमानतळ परिसरात आता एज्यु-सिटी, मेडिसिटी आणि इनोव्हेशन सिटी यांसारखे जागतिक दर्जाचे प्रकल्प उभे राहणार आहेत. विशेष म्हणजे, एसबीजी ग्रुप आणि अल्टा कॅपिटल सारख्या मोठ्या कंपन्यांनी लाखो कोटींच्या गुंतवणुकीचे करार केलेत. केवळ मुंबईच नव्हे, तर गडचिरोली आणि पालघरसारख्या भागांतही आता उद्योगांचे जाळे पसरेल.

### शेअर बाजारात हाहाकार!

**मुंबई ।** जागतिक स्तरावरील वाढता तणाव आणि अमेरिकेच्या आक्रमक व्यापार धोरणांमुळे आज भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली. सप्ताहाच्या दुसऱ्याच दिवशी गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १०६५ अंकांनी कोसळून ८२,१८० वर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३५३ अंकांनी घसरून २५,२३२ वर स्थिरावला. जागतिक तणाव: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युरोपीय देशांवर अतिरिक्त आयात शुल्क (टॅरिफ) लावण्याची धमकी दिल्याने जागतिक बाजारपेठेत खळबळ माजली आहे.



### सायना नेहवालचा बॅडमिंटनला पूर्णविराम

**मुंबई ।** बॅडमिंटन क्वीन सायना नेहवाल हिने स्पर्धात्मक बॅडमिंटनमधून निवृत्तीची घोषणा केली. गेल्या दोन वर्षांपासून सायना गुडघ्याच्या समस्येमुळे त्रस्त होती. अखेर तिने शरीर साथ देत नसल्याचे म्हणत आपल्या कारकिर्दीला पूर्णविराम दिला. सायना गेल्या दोन वर्षांपासून बॅडमिंटनपासून दूर होती आणि तिचा शेवटचा सामना २०२३ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये झाला होता. एका पॉडकास्टमध्ये बोलताना सायनाने स्पष्ट सांगितले की, माझ्या गुडघ्याची दुखापत गंभीर असून मला संधिवात झाला आहे. सर्वोत्तम खेळ करण्यासाठी तुम्हाला दिवसाला ८ ते ९ तास सराव करणे आवश्यक आहे.

# शाळा सोडल्याचा दाखला, मार्कशीटसाठी अवैध फी आकारल्यास शाळांवर होणार कारवाई

वृत्तसंस्था । पुणे

**शाळा सोडल्याचा दाखला आणि मार्कशीट देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे पैशांची मागणी करणाऱ्या शाळा आणि महाविद्यालयांविरुद्ध आता कडक पावले उचलली जाणार आहेत. शाळा सोडल्याचा दाखला आणि गुणपत्रिका देताना कोणतीही अवैध रक्कम आकारली जाऊ नये, असे स्पष्ट आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने दिले आहेत.**



पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक गणपत शंकरराव मोरे यांनी पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापक व प्राचार्यांना यासंदर्भात लेखी पत्रक पाठवले आहे.

आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी यासंदर्भात तक्रार अर्ज दाखल केला होता. शाळांमध्ये दाखले देताना विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची तक्रार या अर्जाद्वारे शिक्षण विभागाकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत शिक्षण उपसंचालकांनी सर्व शैक्षणिक संस्थांना कडक सूचना दिल्या आहेत.शिक्षण संचालनालयाच्या ५ जून २०२५ च्या संदर्भानुसार, विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्रे देताना कोणत्याही (पान २ वर)

## मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात बदल

वृत्तसंस्था । मुंबई

वुमन्स प्रीमियर लीग २०२६ मध्ये एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळत आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने सलग पाच सामने जिंकत प्लेऑफमध्ये धडक मारली आहे. यादरम्यान मुंबई इंडियन्सच्या संघात मोठा बदल करण्यात आला आहे. अचानक संघात मॅचविनर खेळाडूची एन्ट्री करण्यात आली आहे.




# धुळ्यात जात पडताळणीसाठी नऊ हजारांची लाच

वृत्तसंस्था । नागपूर

**• प्रकल्प सहायक रंगेहात अटकेत**

**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातील प्रकल्प सहायकाने जात प्रमाणपत्र पडताळणीचे काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तक्रारदाराकडून नऊ हजार रुपयांची लाच स्वीकारताना प्रकल्प सहायक इम्रान अब्दुल रशिद अन्सारी याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या प्रकरणी कनिष्ठ लिपीक प्रमोद रामराव पाटील याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



तक्रारदाराने आपल्या शालकाचे ओबीसी जातीचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी २१ जुलै २०२५ रोजी ऑनलाईन अर्ज करून आवश्यक कागदपत्रे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे कार्यालयात सादर केली होती. त्यानंतर सुनावणीदरम्यानही आवश्यक कागदपत्रे जमा करण्यात आली.

मात्र बराच काळ उलटूनही प्रमाणपत्र मिळत नसल्याने तक्रारदार कार्यालयात सातत्याने पाठपुरावा करीत होता. दरम्यान, प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी याने जात पडताळणीचे काम करून देण्यासाठी १२ हजार रुपयांची लाच मागितली. त्यापैकी तीन हजार रुपये 'फोन पे'च्या माध्यमातून घेतले गेले. तरीही दोन महिने उलटून काम न झाल्याने तक्रारदाराने पुन्हा कार्यालयात भेट दिली असता, कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील याने उर्वरित रकमेची मागणी करत पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही, असे स्पष्टपणे सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे (पान २ वर)

# जळगाव परिमंडलात महावितरणकडून वीज ग्राहकांना मिळाली कोट्यवधींची सवलत

## • वेळेवर वीजबिल भरणा, ऑनलाईन व्यवहारांमुळे लाभ

प्रतिनिधी । जळगाव

**महावितरणच्या जळगाव परिमंडलात डिजिटल सेवांचा वाढता वापर, वेळेवर वीज बिल भरणा आणि ऑनलाईन व्यवहारांमुळे वीज ग्राहकांना मिळालेली सवलत सुमारे सहा कोटी रुपयांच्या घरात पोहोचली आहे. त्यामुळे महावितरणच्या डिजिटल उपक्रमांना ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे.**




महावितरणकडून ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. वीजबिल वितरीत झाल्यानंतर सात दिवसांच्या आत बिल भरल्यास (कर व इतर शुल्क वगळून) सुमारे एक टक्का तत्पर वीज बिल भरणा सवलत दिली जाते. तसेच नेट बँकिंग, क्रेडिट/डेबिट कार्ड, मोबाईल वॉलेट, यूपीआय आदी डिजिटल माध्यमांतून ऑनलाईन वीजबिल भरल्यास (कर व शुल्क वगळून) ०.२५ टक्के डिजिटल बिल भरणा सवलत मिळते. याशिवाय 'गो ग्रीन' पर्याय स्वीकारून छापील बिलाऐवजी ई-मेलवर वीजबिल घेतल्यास दरमहा १० रुपयांची सवलत देण्यात येते. चालू आर्थिक वर्षात जळगाव परिमंडलातील ग्राहकांनी तत्पर वीजबिल भरणा सवलतीतून तब्बल चार कोटी ५४ लाख ६३ हजार रुपये, डिजिटल बिल भरणा सवलतीतून एक कोटी १६ लाख ९७ हजार रुपये आणि गो ग्रीन पर्यायातून २५ लाख ३३ हजार रुपयांची (पान २ वर)

**➤ मंडलनिहाय अशी मिळाली सवलत**

ग्राहकांनी तत्पर वीजबिल भरणात दोन कोटी ८८ लाख १२ हजार रुपये, डिजिटल बिल भरणा सवलत ७१ लाख ३५ हजार रुपये आणि गो ग्रीन पर्यायातून १६ लाख २६ हजार रुपये, अशी एकूण तीन कोटी ७५ लाख ७३ हजारांची सवलत मिळवली. धुळे मंडलात एक कोटी २१ लाख २५ हजार रुपये, ३१ लाख ८१ हजार रुपये आणि पाच लाख ७० हजारांची सवलत.. तर नंदुरबार मंडलात तत्पर वीजबिल भरणात ४५ लाख २६ हजार रुपये, डिजिटल बिल भरणात १३ लाख ८० हजार आणि गो ग्रीन पर्यायातून तीन लाख ३७ हजार रांची सवलत मिळवली आहे.

# शिक्षकांना पदोन्नतीसाठी टीईटी अनिवार्यच?

वृत्तसंस्था । पुणे

**पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण अनिवार्य**

**राज्यात शिक्षक संवर्गातून पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असण्याच्या अनिवार्यतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. टीईटी उत्तीर्ण या अर्हतेबरोबरच पदोन्नतीसाठी आवश्यक अन्य अर्हता धारण केलेले शिक्षकच पदोन्नतीसाठी पात्र असल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.**

शिक्षक सेवेत येऊ इच्छिणाऱ्या नव्या उमेदवारांसह सेवेत कार्यरत राहू इच्छिणारे शिक्षक, पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण अनिवार्य असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच दिला. निवृत्त होण्यास पाच वर्षे बाकी असलेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली. मात्र, निवृत्त होणाऱ्या शिक्षकांना पदोन्नती हवी असल्यास पदोन्नतीसाठी त्यांनाही टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक करण्यात आले.

तसेच टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर राज्य परीक्षा परिषदेने समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) पदासाठी जाहीर केलेल्या विभागीय परीक्षेच्या पात्रतेमध्येही टीईटी उत्तीर्ण असण्याची तरतूद नमूद केली आहे. या अनुषंगाने, प्राथमिक शिक्षण संचालकांनी शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) व विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदावर पदोन्नती प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत शासन स्तरावरून मार्गदर्शन मिळण्याची विनंती पत्राद्वारे केली होती. या पत्राला आता (पान २ वर)

# संपादकीय

## कार्यकर्त्यांचीच निवडणूक

राज्यातील २९ महानगरपालिकांची निवडणूक नुकतीच पार पडली आणि या निवडणुकीमध्ये मतदारांनी दिलेल्या कौलाचे विश्लेषणही सुरू झाले आहे. या निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान बहुतेक सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात असे म्हणत होते आणि या निवडणुकीतील निकालावर जर नजर टाकली एक गोष्ट निश्चितपणे स्पष्ट होते, ते म्हणजे ज्या पक्षाला ज्या ठिकाणी कार्यकर्त्यांचे मोठ्या प्रमाणावर पाठबळ होते त्या पक्षाला त्या ठिकाणी चांगले यश मिळालेले दिसते. राज्यात प्रामुख्याने सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला बहुतांशी महानगरपालिकांमध्ये चांगले यश मिळाले असले, तरी काही ठिकाणी त्यांना पराभवही पत्करावा लागला आहे. ज्या ठिकाणी भारतीय जनता पक्षावर विरोधी पक्षांनी मात केली आहे, त्या ठिकाणची परिस्थिती बघितली तर विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मनापासून काम केल्यामुळे भारतीय जनता पक्षाला पराभूत करण्यात त्यांना त्या ठिकाणी यश आलेले दिसते. लातूर महानगरपालिकेमध्ये अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखालील ज्या प्रकारे काँग्रेसने एकतर्फी यश मिळवून महापालिकेवर सत्ता मिळवली ते यश निश्चितच कार्यकर्त्यांचे यश होते. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या विधानामुळे भारतीय जनता पक्ष इथे नकारात्मक परिस्थितीत गेला. त्याचाही फटका जरी भारतीय जनता पक्षाला बसला असला तरी लातूरमधील काँग्रेस कार्यकर्त्यांचा पाया भक्कम असल्यामुळेच तेथे चांगले यश मिळाले. अशीच परिस्थिती कोल्हापुरातही पाहायला मिळाली. कोल्हापूरमध्ये सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा पाया भक्कम असल्यामुळे त्या ठिकाणी काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला. जरी महायुतीला संपूर्णपणे हरवण्यात काँग्रेस पक्ष अयशस्वी ठरला तरी एक प्रबळ विरोधी पक्ष म्हणून कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये काँग्रेस समोर येताना दिसत आहे. परभणीमध्येसुद्धा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने सत्ता ताब्यात घेतली. तेथेसुद्धा उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकांचा पाया भक्कम असल्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला तेथे शिरकाव करता आला नाही आणि भारतीय जनता पक्षालासुद्धा यश मिळवता आले नाही. चंद्रपूर, अमरावती, भिवंडी यासारख्या महानगरपालिकांमध्ये सुद्धा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मनापासून काम केल्यामुळे त्या ठिकाणी काँग्रेसला चांगले यश मिळाले. केवळ मुंबईचा विचार करता भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना महायुतीला सत्ता मिळाली असली, तरी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे यशही कार्यकर्त्यांच्या बळावरच मिळालेले दिसते. उद्धव ठाकरे यांना सोडून एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्या अनेक नगरसेवकांना या निवडणुकीमध्ये पराभव पत्करावा लागला आणि या निमित्ताने अनेक नवीन कार्यकर्ते नगरसेवकाच्या स्वरूपात उद्धव ठाकरे यांच्या सेनेमध्ये दाखल झाले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेलासुद्धा कार्यकर्त्यांच्या पाठबळावर निवडणुकीत बर्यापैकी यश मिळालेले दिसले. म्हणजेच विरोधी पक्षांना ज्या ठिकाणी त्यांच्या कार्यकर्त्यांचे पाठबळ चांगले मिळाले त्या ठिकाणी यश मिळाले, तसे सत्ताधारी पक्षालासुद्धा हा अनुभव आलेला दिसतो. पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर, नाशिक, सोलापूर या ठिकाणी भारतीय जनता पक्षाने मिळवलेले यश केवळ कार्यकर्त्यांच्या पाठबळावरच आहे.

# हिंदू राष्ट्र जागृती सभा १ फेब्रुवारी रोजी

## लोकांसाठी हा उपक्रम स्तुत्य असून अभूतपूर्व आहे : जळकेकर महाराज

प्रतिनिधी । जळगाव



**हिंदु जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्ववादी संघटनाच्या वतीने आयोजित विराट हिंदु राष्ट्र जागृती सभा, रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी, मानराज पार्क जवळील श्रीराम मंदिर संस्थानाच्या मैदानात आयोजित करण्यात आली आहे.**

यानिमित्ताने शहरातील पद्मावती मंगल कार्यालयात शहरातील विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ह.भ.प जळकेकर महाराज, ह.भ.प. विक्रम महाराज, ह.भ.प. वरसाडेकर महाराज आणि सनातन संस्थेचे धर्मप्रसारक संत सद्गुरु श्री नंदकुमार जाधव हे व्यासपिठावर उपस्थित होते. या वेळी सद्गुरु नंदकुमार जाधव यांनी सांगितले की प्रभू रामचंद्र यांच्या भूमीवर विराट हिंदुराष्ट्र सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेमुळे शहरातील आणि जिल्ह्यातील वातावरण धर्ममय आणि उत्साहमय होते. यासाठी सर्व हिंदू धर्म प्रेमींनी या सभेच्या कार्यात सहभागी होऊन धर्माची सेवा करावी असे आवाहन त्यांनी या वेळी केले. त्यानंतर ह.भ.प. जळकेकर महाराज यांनी सांगितले की हिंदू धर्मातील लोकांसाठी हा उपक्रम स्तुत्य असून अभूतपूर्व असा प्रतिसाद याला मिळत असतो या सभेच्या वेळी लावण्यात आलेल्या विविध प्रदर्शनी, तसेच काढण्यात आलेली वाहन फेरी यातून शहरात मंगलमय वातावरण निर्माण होते. यासाठी सर्व हिंदूंनी तन मन धन यांचा त्याग करून यात सहभागी झाले पाहिजे. ह भ प वडसाडेकर महाराज यांनी या वेळी सांगितले की, वर्षातून एकदा होणाऱ्या या सभेत सर्व हिंदूंनी सहभागी झाले पाहिजे. ह.भ.प. विक्रम महाराजांनी सांगितले की शहरासोबत ग्रामीण भागातील सर्व हिंदूंनी या सभेत उपस्थित राहून आपले धर्मकार्तव्य बजावले पाहिजे. या वेळी, नवनिर्वाचित नगरसेवक डॉक्टर वीरेंद्र खडके, विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, आणि कार्यकर्ते

### वाहन फेरीचे आयोजन

सभेचा प्रसार होण्यासाठी शुक्रवारी ३० जानेवारी दुपारी ४ ते ६ या वेळेत वाहन फेरीचे आयोजन केले आहे. सभेच्या मैदानापासून फेरीला सुरुवात होऊन पिंप्राळा, खोटे नगर, भोईटे नगर, प्रेम नगर या भागातून फेरी जाणार आहे. यात अधिकाधिक धर्म बांधवांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. तांबट यांनी या वेळी केले.

# मेहरूण परिसरात महाराणा प्रताप यांना अभिवादन



प्रतिनिधी । जळगाव

शहरात सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या विचार वारसा फाउंडेशनच्या वतीने महाराणा प्रताप यांच्या पुण्यतिथीनिमित्त मेहरूण परिसरात सोमवारी (१९ जानेवारी) अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आणि फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विशाल देशमुख उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, महाराणा प्रताप हे केवळ मेवाडचे राजे नव्हते, तर ते स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी आयुष्यभर संघर्ष केला, मात्र कधीही शरणागती पत्करली नाही. त्यांचा हाच ज्वलंत वारसा आजच्या तरुण पिढीने आत्मसात करण्याची गरज आहे.

# व्ही. पी. होले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिर



प्रतिनिधी । जळगाव

के. सी. ई. सोसायटी संचलित व्ही. पी. होले शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,(स्वायत्त) जळगाव यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हिवाळी विशेष शिबिराचे उद्घाटन दिनांक १९ जानेवारी २०२६, सोमवार रोजी मोहाडी येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन मोहाडी येथील कै. गोटूभाऊ सोनवणे शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय एस. एस. शिरसाठ सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे सर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी आपल्या भाषणात प्रमुख पाहुणे एस. एस. शिरसाठ यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवाभाव व जबाबदारी निर्माण करणारी चळवळ आहे असे सांगितले.

# विद्यापीठात रासेयोचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा व विभाग समन्वयक यांची रासेयो उपक्रम नियोजन व आयोजन संदर्भात सहविचार सभा सोमवार सकाळी ११ वाजता डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवन येथे आयोजित करण्यात आली. या सभेत कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील व रा.से.यो. संचालक प्रा.व्ही.एम. रोकडे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा-विभागीय रासेयो समन्वयक यांच्या सहविचार सभेत शासन निर्देशानुसार उपक्रम व विशेष शिबीर केंद्रीय पध्दतीने लेखा परिक्षण सादर करणे, बाबत रासेयो एककांचे कार्यक्रम अधिकारी यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात विचार विनिमय करण्यात आला.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात महिला नेतृत्व कार्यशाळेचा शानदार शुभारंभ

प्रतिनिधी । जळगाव



**खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित शैक्षणिक संस्थेतर्फे आयोजित महिला नेतृत्व या विषयावरील विशेष कार्यशाळेचा दि. १९ रोजी सोमवारी उत्साहात प्रारंभ झाला. महिलांचे शैक्षणिक स्तरावरील नेतृत्व गुण विकसित करणे आणि त्यांना प्रशासकीय कौशल्यांचे प्रशिक्षण देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.**

या कार्यशाळेत संस्थेच्या विविध विभागांतील एकूण ३५ महिला प्राध्यापिकांनी सहभाग नोंदवला. संपूर्ण दिवसाच्या नियोजनात एकूण तीन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या तिन्ही सत्रांमध्ये मशैक्षणिक स्तरावर महिलांचे नेतृत्व कसे वाढवावे, यावर कृतिशील प्रशिक्षण देण्यात आले. कार्यशाळेचे बौद्धिक सत्र अत्यंत प्रभावी ठरले. डॉ. मृणालिनी फडणवीस (शैक्षणिक संचालक ) यांनी दोन सत्रांमध्ये प्राध्यापिकांना नेतृत्वाच्या बारकाव्यांबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. विजेता सिंग यांनी एक सत्र घेऊन शैक्षणिक प्रशासनातील आव्हाने आणि संधी यावर प्रकाश टाकला.या प्रशिक्षणास मरोल मॉडेलफ (आदर्श व्यक्तिमत्व) म्हणून खासदार स्मितीताई वाघ यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या व्याख्यानातून त्यांनी महिलांनी जिद्दीने आणि आत्मविश्वासाने नेतृत्वाची धुरा कशी सांभाळावी, याचे सूत्रबद्ध मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. ज्योती भोळे यांनी खासदार स्मिता वाघ यांची ओळख करून दिली. संपूर्ण दिवसाच्या कार्यशाळेचे नेटके नियोजन आणि नियंत्रण प्रा. भावना मानेकर यांनी यशस्वीपणे सांभाळले.

# पान १ वरुन

**कुपोषणामुळे होणारे मृत्यू......**

अभय मंत्री यांच्या खंडपीठाने दखल घेऊन त्याबाबत चिंता व्यक्त केली. तसेच, राज्य सरकार उपाययोजनांची ठोस अंमलबजावणी करण्यात कमी पडत असल्याचीही टीका केली. मागील तीन दशकांपासून मेळघाटाला कुपोषणाच्या समस्येने ग्रासले आहे आणि बाल व मातामृत्यूंचे सत्र सुरूच आहे. याला रोखण्यासाठी सरकारने शून्य मृत्यूचा दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक असून त्यानुसार ठोस उपाययोजना करायला हव्यात, असेही न्यायालयाने सुनावले.

**शाळा सोडल्याचा दाखला......**

प्रकारची अतिरिक्त फी आकारणे बेकायदेशीर आहे. या आदेशाचे उल्लंघन करून अवैध रक्कम घेतल्याचे निदर्शनास आल्यास किंवा त्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित संस्था आणि जबाबदार व्यक्तींवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशारा या पत्राद्वारे देण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला असून शाळांच्या मनमानी कारभाराला चाप बसणार आहे.

**जळगाव परिमंडलात......**

सवलत मिळवली आहे. गो ग्रीन पर्याय स्वीकारण्याचे आवाहन - महावितरणने वीजबिल पाहणे व भरणे, तक्रार नोंदवणे, नवीन वीज जोडणीसाठी अर्ज करणे, वीजभार व नाव बदलणे यांसह सर्व सेवा महावितरणची अधिकृत वेबसाईट व ग्राहक मोबाईल ॲपद्वारे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून दिल्या आहेत. या सेवांमुळे ग्राहकांचा वेळ, श्रम आणि खर्च वाचत असून सेवा अधिक सुरक्षित, जलद आणि पारदर्शक झाल्या आहेत. डिजिटल सेवांचा लाभ घेऊन ग्राहकांनी नियमित व वेळेत ऑनलाईन वीजबिल भरणा करावा तसेच वीज बिलांसाठी ङ्गगो ग्रीनफ पर्याय स्वीकारावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

**धुळ्यात जात पडताळणीसाठी......**

आठ जानेवारी २०२६ रोजी तक्रार दाखल केली. पंचांसमक्ष पडताळणीदरम्यान प्रकल्प सहायक अन्सारी याने तडजोडीनंतर नऊ हजार रुपयांची लाच स्वीकारण्याचे मान्य केले, तसेच कनिष्ठ लिपीक पाटील याने लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर १९ जानेवारी २०२६ रोजी सापळा रचून कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान इम्रान अन्सारी याला तक्रारदाराकडून नऊ हजार रुपये स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. धुळे शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईचे पर्यवेक्षण पोलीस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांनी केले.

सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक यशवंत बोरसे यांनी काम पाहिले असून, तपास पोलीस निरीक्षक पद्मावती कलाल करीत आहेत. या कारवाईमुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सामान्य नागरिकांना शासकीय प्रक्रियेत होणाऱ्या दिरंगाईचा फटका बसत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. शैक्षणिक प्रवेश, नोकरी व विविध शासकीय योजनांसाठी अत्यावश्यक असलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी लाच मागितली जात असल्याच्या तक्रारी वाढत असल्याने, प्रशासनाने अंतर्गत चौकशी करून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, शासकीय, निमशासकीय कर्मचारी किंवा खासगी व्यक्तीने काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना केले आहे.

**शिक्षकांना पदोन्नतीसाठी......**

शिक्षण विभागाचे अवर सचिव शरद माकणे यांनी पत्राद्वारे दिलेल्या उत्तरानुसार, न्यायनिर्णयाच्या संदर्भात पुढील कार्यवाहीबाबत राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिपद, तसेच केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडे विचारणा करण्यात आली आहे. याबाबतचे अभिप्राय अप्राप्त आहेत.

तसेच न्यायनिर्णय पारीत झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे कालावधीत टीईटी उत्तीर्ण होण्याच्या अटीच्या अधीन राहून शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) आणि विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदावर तूर्तास पदोन्नती देता येणार नाही. टीईटी उत्तीर्ण या अर्हतेबरोबरच पदोन्नतीसाठी आवश्यक अन्य अर्हता धारण केलेले शिक्षकच पदोन्नतीसाठी पात्र असल्याचे पत्राद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

गोसावी म्हणाले, पदोन्नतीच्या कार्यवाहीबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागण्यात आले होते. टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली असल्याने दोन वर्षांच्या मुदतीत टीईटी उत्तीर्ण होण्याच्या अटीच्या अधीन राहून पदोन्नती देण्याबाबत जिल्हा स्तरावरून, तसेच संघटनांकडून मागणी करण्यात आली होती. मात्र, आता शासनाच्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

# धूम मचा दे नृत्य स्पर्धेत खुबचंद विद्यालयाचे यश

प्रतिनिधी । जळगाव

येथील उडान फाऊंडेशनतर्फे आयोजित धूम मचा दे या देशभक्तीपर आणि लोकनृत्य स्पर्धेत खुबचंद सागरमल विद्यालयाच्या संघाने यश संपादन केले. मुख्याध्यापिका योगिनी बेंडाळे, सुरेश आदिवाल यांनी यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार केला. या विद्यार्थिनींना कल्पना देवरे, विजय पवार आणि सुनील साळवे यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमासाठी पूजा मलारा यांचे विशेष सहकार्य लाभले. लक्ष्मीकांत महाजन, अजय पाटील, प्रवीण पाटील यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. अशी माहिती शाळेकडून देण्यात आली.

# भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

प्रतिनिधी । जळगाव



**ओरिसा राज्यातील कटक येथील घटनेचा निषेध करत विविध मागण्यासाठी भारत मुक्ती मोर्चा तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी मूलभूत अधिकारांचे हनन होत आहे असा आरोप संघटनेतर्फे करण्यात आला करण्यात आला.**

बामसेफचे राष्ट्रीय अधिवेशन ओबीसी जातीनिहाय जनगणनेला समर्पित करण्यात आले होते तर भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अधिवेशन ईव्हीएम वरील निवडणुका घेऊ नयेत. या मागणीसाठी समर्पित होते. अधिवेशनासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या प्रशासनाकडुन मिळाल्या असतानाही कटक येथील आर.एस.एस.व भारतीय जनता पक्षाशी संबंधित लोकांनी महानगर पोलीस प्रशासन व जिल्हाधिकारी कटक यांच्यावर प्रचंड दबाव टाकला. या दबावाला बळी पडुन कटक प्रशासनाने ऐनवेळी अधिवेशनाच्या सर्व परवानग्या रद्द केल्या.यामुळे अधिवेशन होऊ शकले नाही. म्हणून या घटनेचा निषेध करत जळगावात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारत मुक्ती मोर्चाचे जळगाव जिल्हा अध्यक्ष देवानंद निकम व जिल्हा आंदोलन प्रभारी सुनिल देहडे यांच्या नेतृत्वाखाली हे धरणे आंदोलन करण्यात आले.निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

हे धरणे आंदोलन भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा व बहुजन क्रांती मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आले.

या धरणे आंदोलनात सुमित्र अहिरे, शशिकांत हिंगोणेकर, दिलीप जाधव, किशोर तायडे, एस.एस.राणे, अमोल कोल्हे, डी. एम.भालेराव, प्रा.रामभाऊ सोनवणे, अविनाश वानखेडे, अरुण जाधव,संजना जाधव, रविंद्र मोरे, सुभाष इंगळे, डॉ.शाकीर शेख, गनी शाह, अकील कासार, प्रमोद सौंदणे पाटील या सह नागरिक या आंदोलनात सहभागी होते.

# 'गझल' समजून घेण्यासाठी उत्तम रसिक असणे आवश्यक : ज्ञानेश पाटील

प्रतिनिधी । जळगाव




**गझल ही केवळ छंदाची मांडणी नसून ती कवीच्या संवेदनशीलतेची आणि भाषेवरील पकडीची कसोटी असते.त्यामुळे उत्तम काव्यदृष्टी, अनुभवाची खोली आणि शब्दावरील प्रभुत्व असलेला कवीच प्रभावी गझलकार होऊ शकतो. गझल हा श्रोत्यांचा आवडता प्रकार आहे. परंतु गझलेचे व्याकरण समजून घेण्यासाठी वाचन आणि उत्तम गझलकारांचे सादरीकरण अनुभवणे आवश्यक आहे. असे मत गझलकार ज्ञानेश पाटील यांनी व्यक्त केले.**

मू. जे. महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित मी आणि माझी गझल या विषयावरील विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी, गझल म्हणजे काय?, कविता आणि गझल यातील फरक सांगून फारसी, अरबी, उर्दू भाषेतील गझल, मराठीतील माधव ज्युलियन, सुरेश भट, बशीर बद्र, इलाही जमादार यांच्यापासून ते सतीश दराडे, वैभव देशमुख या गझलकारांच्या हिंदी, उर्दू आणि मराठी भाषेतील गझला सादर करून गझलेचा प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला.

२००५ पासून गझललेखन करीत आहे. या प्रवासात अनेक भाषांमधील गझलांनी मला प्रेरणा मिळाली. आजचा काळ तत्काळ प्रसिद्धी मिळविण्यासाठी हापापलेल्यांचा काळ आहे. तत्काळ मिळणारी प्रसिद्धी दीर्घकाळ टिकणारी नसते. मात्र याचे भान आज अनेकांना नाही हे पाहतांना वाईट वाटते. कवितेचे मूल्य जपण्यासाठी प्रत्येकाने त्यातील गांभीर्य ओळखले पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी त्यांच्या गझल लेखनाची सुरुवात आणि नंतरचा लेखन प्रवास सांगितला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी महाविद्यालयाच्या मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. भूपेंद्र केसूर होते. प्रा. केसूर यांनी अध्यक्षीय भाषणात, वाचनासोबतच ऐकणे हा गुण विद्यार्थ्यांनी आपल्यात रुजवला पाहिजे. तसेच मराठी भाषेचे जतन, संवर्धन करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी मराठी विभागप्रमुख प्रा. विद्या पाटील, डॉ. संगीता चंद्रात्रे, डॉ. जयश पाडवी, डॉ. योगेश महाले, डॉ. विलास धनवे, डॉ. मनोज महाजन, डॉ. राजीव पवार, प्रा. जितेंद्र मोरे, प्रा. गोपीचंद धनगर, डॉ. ज्ञानदेव सोनटक्के तसेच विविध विद्याशाखांमधील मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. पुरुषोत्तम महाजन यांनी केले.

# आदर्श माहेश्वरी महिला मंडळाचा ज्येष्ठांशी संवाद

प्रतिनिधी । जळगाव

आदर्श माहेश्वरी महिला मंडळाने संक्रांतीचे औचित्य साधत मातोश्री आनंदाश्रम येथे भेट दिली. या वेळी पदाधिकारी व सदस्यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. आश्रमातील आजी-आजोबांसोबत मंडळातील सदस्यांनी संक्रांत साजरी केली. भक्तीगीते व गाण्यांच्या भेंड्या असे छोटे-छोटे मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले. त्यामुळे आश्रमातील सर्व ज्येष्ठ आनंदी झाले आणि आश्रमाच्या वातावरण खूपच प्रसन्न झाले. मंडळाकडून उपयोगासाठी चार बेडसाईड टेबल्स भेट देण्यात आले. आजी-आजोबा सोबत गप्पा मारताना आणि त्यांचे हसरे चेहरे पाहताना सर्व सदस्यांचे मन भरून आले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# खोलविहीर रस्त्यावर चक्क मातीवरच केले डांबरीकरण

## सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे ग्रामस्थांमध्ये संतप्त प्रतिक्रिया

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर तालुक्यात सध्या विकासकामांच्या नावाखाली नेमके काय सुरू आहे, असा प्रश्न ग्रामीण भागातील नागरिक करत आहेत. कारण एका रस्त्याच्या कामात चक्क मातीवरच डांबरीकरण केल्याने संतापजनक भावना सोशल मीडियावर नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागात आता स्थानिकांनी कंत्राटदार आणि संबंधित विभागाच्या भ्रष्ट कारभाराचे वाभाडे काढले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, नवापूर तालुक्यातील खोलविहिर या गावापुढे अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याचे काम अखेर सुरू झाले. मात्र, रस्ता तयार करताना पाळले जाणारे नियम धाब्यावर बसवून, आधीची धूळ आणि माती न काढताच त्यावर थेट डांबराचा थर पसरवण्यात आला. हा प्रकार एवढा निकृष्ट आहे की, हाताने उपसले तरी डांबर मातीसह उखडून येणार आहे.

नागरिकांनी संताप करत बंद कॅमेऱ्यात या रस्त्याच्या निष्कृष्ट कामाबद्दल नाराजी व्यक्त केली काम बंद करण्याची मागणी केली आहे. संतापलेले नागरिकांनी आमच्या कराच्या पैशांची ही अशी लूट आम्ही सहन करणार नाही. हे डांबरीकरण आहे की निव्वळ धूळफेक? असा सवाल उपस्थित केला आहे.

समाज माध्यमांवर याचे व्हिडिओ व्हायरल होत असून प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. रस्त्याचे काम सुरू असताना त्यावर देखरेख ठेवण्यासाठी संबंधित विभागाचे अभियंते उपस्थित का नव्हते? असा सवाल आता विचारला जात आहे. कंत्राटदाराला वाचवण्यासाठीच प्रकार जाणीवपूर्वक केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या निकृष्ट कामाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित कंत्राटदाराचा परवाना रद्द करावा आणि दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# परिवहन कार्यालयात ट्रक-मालकांचे ठिय्या आंदोलन आमदारांच्या मध्यस्थीनंतर मागे

प्रतिनिधी । धुळे

**वाहनांच्या फिटनेस नूतनीकरणासाठी ऑनलाइन स्लॉट मिळत नसल्याने आणि एटीएस केंद्राच्या जाचक अटींमुळे अडचणीत आलेल्या धुळे जिल्हा व उत्तर महाराष्ट्र ट्रक ओनर्स असोसिएशनने आज प्रादेशिक परिवहन कार्यालयावर धडक दिली. तब्बल १९ दिवसांपासून रखडलेल्या वाहन पासिंगच्या प्रश्नावर संतप्त ट्रक मालकांनी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.**

अखेर शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधल्यानंतर, जुन्या नियमानुसार पासिंग करण्याचे आदेश मिळाल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले. याप्रकरणी असोसिएशनच्यावतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी चारुदत्त व्यवहारे यांना निवेदन देण्यात आले.

आंदोलकांच्या भावना समजून घेत शहराचे आमदारांनी पालक मंत्री जयकुमार रावल आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या त्वरित मोबाईलवरून संपर्क साधला आणि त्यांनी सुद्धा तेवढ्याच तातडीने यात निर्णय घेतल्याने प्रश्न सुटला असे, ट्रक ओनर्स असो.चे मनोज राघवन यांनी सांगितले. मंत्र्यांच्या सकारात्मक निर्णयामुळे गेल्या १९ दिवसांपासून रखडलेला पासिंगचा प्रश्न सुटला आहे.

या आंदोलनात उत्तर महाराष्ट्र ट्रक ओनर्स असोसिएशनचे मनोज राघवन, सुनील पाटील, सिद्दीकी उमरानी, रवींद्र मराठे, मनीष पाटील, सलीम अन्सारी, हरीष विभुते, शरद गोसावी, रमेश जोशी, सुनील चौधरी, किसन भारस्कर, प्रभाकर सपकाळ, दिलीप शर्मा यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व वाहनचालक उपस्थित होते.

## थोडक्यात

### मारहाण प्रकरणी दोघांवर गुन्हा

**धुळे ।** शहरातील हाफीज सिद्दीकी नगरात एकास बेदम मारहाण करीत जखमी केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. रहिस अहेमद निसार अहमद शाह (वय ४०) असे जखमीचे नाव आहे. याबाबत त्यांनी चाळीसगाव रोड पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी सोडा शरबरची गाडी माझ्या घरासमोर लावु नको, असे सांगितले, त्याचा राग येवून मोहम्मद आरीफ मोहम्मद हनीफ याने काठीने गालावर व पायावर मारून जखमी केले. तर मुलगा अरशद यास शिवीगाळ केली. तसेच मुजाहीद अन्सारी (रा. हाफीज सिद्दीकी नगर) याने फिर्यादीस शिवीगाळ करीत हाताबुक्यांनी मारहाण केली. जीवे मारण्याचीही धमकी दिली. गुन्ह्याचा पुढील तपास पवार करीत आहेत.

### धोकादायक क्रॉसिंगमुळे अपघाताचा धोका

**धुळे ।** शहरातील आग्रा रोडवर नव्याने दुभाजक उभारण्यात आले असून, रस्त्याचे कामही करण्यात आले आहे. या सस्त्यावर नवरंग जलकुंभाजवळ असलेल्या भाजी बाजारासमोर एका ठिकाणी रस्ता ओलांडण्यासाठी जागा मोकळी ठेवली आहे. या ठिकाणाहून रात्रीच्या वेळी अचानक विरुद्ध दिशेने वाहनधारक रस्त्यावर येत असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या ठिकाणी दुभाजक उभारावे, अशी मागणी आहे.

### शिष्यवृत्ती योजनेची मुदत ३० जानेवारीपर्यंत वाढवली

**धुळे ।** राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेसाठी अर्ज भरण्याची मुदत ३० जानेवारीपर्यंत वाढवली असल्याची माहिती समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त संजय सैंदाणे यानी दिली.

### मुलावर अत्याचार, धुळ्यात गुन्हा दाखल

**धुळे ।** देवपुरातील नवरंग जलकुंभाच्या परिसरात अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार करण्यात आला. या प्रकरणी देवपूर पोलिसात एका अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत ३० वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरून ११ वर्षीय मुलाला घराजवळ राहणाऱ्या १७ वर्षांय मुलाने सोबत नेले. तसेच अत्याचार केला. १७ रोजी हा प्रकार घडला होता. या प्रकरणी देवपूर पोलिसात गुन्हा दाखल झाला. पोलिस उपअधीक्षक राजकुमार उपासे तपास करत आहेत.

# लळिंग टोलनाक्याजवळ ट्रकसह १ कोटींची व्हिस्की जप्त

प्रतिनिधी । धुळे

**मोहाडी येथील पोलिसांनी विदेशी दारूची तस्करी उधळून लावली. कारवाई करत १० लाखांचा ट्रक आणि ९२ लाख १६ हजार रुपयांची गोवा व्हिस्की असा एकुण १ कोटी २ लाख १६ हजाराचा मुद्देमा जप्त केला. या कारवाईत ट्रकचालक मुकेश नाथु प्रजापती (वय ३८, रा. धानी कचावदा, ता. धरमपुरी, जि. धार, मध्यप्रदेश) यास अटक करण्यात आली. ही कारवाई रविवार दि.१८ जानेवारी रोजी करण्यात आली.**



मालेगावकडून धुळ्याकडे एमएच २३ एयू ७०४२ क्रमांकाच्या ट्रकमधून विनापरवाना विदेशी दारूची वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती मोहाडी नगर पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक शिल्पा पाटील यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी तातडीने पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. पोलिस पथकाने शोधमोहीम राबवत सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास लळींग टोलनाक्यापुढे धुळे रोडवरील जय मल्हार चाय टपरीसमोर संशयित ट्रक अडविला.

ट्रकचालकाची चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने वाहन मोहाडी नगर पोलिस ठाण्यात आणून झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान ट्रकमध्ये गोवा व्हिस्की नावाच्या विदेशी दारूचे एकूण १,५०० बॉक्स आढळून आले. प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बाटल्या (प्रत्येकी १८० मिली) असून त्याची किंमत ९२ लाख १६ हजार रुपये आहे. याशिवाय सुमारे १० लाख रुपये किमतीचा ट्रक असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी ट्रकचालक मुकेश नाथु प्रजापती याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई), (अ), ८३, १०८ प्रमाणे मोहाडी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहाडी नगर पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक शिल्पा पाटील, पोलिस उपनिरीक्षक नितीन करंडे, पोलिस हवालदार सचिन वाघ, श्रीकांत निकुंभे, पोलिस कॉन्स्टेबल जितेंद्र सैंदाणे, चेतन झोळेकर व पवन थोरात यांच्या पथकाने केली.

### वडारवाडी येथील अल्पवयीन मुलीचे अपहरण

प्रतिनिधी । धुळे

तालुक्यातील पिंपळनेर येथील घोड्यामाळ भागातील वडारवाडी येथे राहणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले आहे. ती दि.१७ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास किराणा दुकानावर जावुन येते, असे सांगून गेली. मात्र परत आली नाही. अज्ञात आरोपीने काहीतरी आमिष दाखवून पळवून नेल्याशी तक्रार तिच्यावडीलांनी काल पिंपळनेर पोलिसात दिली.

# साक्रीच्या वर्षा ठाकरे यांना 'गिरणा गौरव' पुरस्कार

प्रतिनिधी । साक्री

**गिरणा गौरव प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा २७ वा गिरणा गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यंदाच्या पुरस्कारासाठी चित्रपट दिग्दर्शक व निर्माते नागराज मंजुळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह साक्रीच्या वर्षा ठाकरे यांना आदर्श ग्रामसेवा पुरस्कार जाहिर झाला आहे.**

तसेच पत्रकार विलास बडे, आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी, दत्तात्रय वारे (पुणे), सहकार महर्षी श्रीराम शेटे (दिंडोरी), लोकसेवा प्रकाश दायमा (निफाड), समाजसेवक मुक्तेश्वर शेट्टीवर (नाशिक), योगगुरू प्रज्ञा पाटील (नाशिक), समाजसेवक प्रकाशचंद्र सोनाग्रा (सटाणा), शिक्षणसेवा शैलेंद्र सोनजे (मालेगाव), समाजसेवक रतन चौधरी (सुरगाणा) यांची यंदाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. महाकवी कालिदास कलामंदिरात येत्या पाच एप्रिल रोजी या पुरस्काराचे वितरण होणार असल्याची माहिती गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार यांनी दिली आहे. मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारासाठी शिवराज नरवडे, विद्यानंद पाटील, भगवान गायकवाड, भाऊसाहेब राजोळे, अनिल निकम, अशोक पाटील या समितीने पुरस्कार्थीची निवड केली आहे.

# भोनगाव ग्रामस्थांची अवैध दारूविक्री बंदची मागणी

प्रतिनिधी । साक्री

साक्री तालुक्यातील भोनगाव ग्रामपंचायत हद्दीत अवैध दारूचा सुळसुळाट सुरू असल्याचा आरोप करीत ही अवैद्य दारू विक्री त्वरित बंद करावी, अशी मागणी भोनगाव ग्रामस्थांनी साक्री पोलिसांकडे केली.



याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भोनगाव ग्रामपंचायत हद्दीत अवैधरित्या दारू विक्री होत आहे. या दारूमुळे गावातील तरुणाई व्यसनाधीन होत चालली असून गावात भांडण तंटे त्याचप्रमाणे गावातील शांतता भंग होत आहे.

भोनगाव ग्रामपंचायततर्फे एकमुखाने ठराव करून अवैद्य दारू विक्री त्वरित बंद झालीपाहिजे, अशी मागणी साक्री पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांकडे करण्यात आली. निवेदनावर सरपंच नाना मगन सोनवणे, उपसरपंच मधुकर जगन्नाथ खैरनार, ग्रामसेविका स्मिता तोरणे तसेच नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### वाहनधारकांसाठी धोकादायक खड्डा

प्रतिनिधी । धुळे

शहरातील जेलरोडवरील जिल्हा कारागृहासमोर अनेक दिवसांपासून खड्डा पडला आहे. वळणावरच हा खड्डा आहे. त्यामुळे वाहनधारकांना वळण घेताना खड्ड्याला वळसा घालून जावे लागते. अगोदरच हा रस्ता अरुंद असल्याने खड्डा वाहनधारकांसाठी धोकादायक ठरतो आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने हा खड्डा बुजवण्याची आवश्यकता आहे. तसे झाल्यास या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. तसेच अपघात होण्याचा धोका टळेल. त्यामुळे या विषयाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

# हिंद दी चादर कार्यक्रमात सहभागी व्हावे : मंत्री रावल

प्रतिनिधी । धुळे

**हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या कार्यक्रमात धुळे जिल्ह्यातील समाजबांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले आहे.**

पालकमंत्री श्री. रावल यांनी म्हटले आहे की, श्री गुरु तेग बहादूर यांचा त्याग, बलिदान व मानवतेसाठी दिलेल्या शहिदीचा इतिहास देश-विदेशात पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदाय एकत्र येणार आहेत. या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यातील समाजबांधवांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री श्री. रावल यांनी केले आहे.


जिल्ह्यात या कार्यक्रमाविषयी जनजागृती होण्यासाठी जि.प.च्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवन कार्यावर आधारित चित्रकला, वक्तृत्व, निबंध स्पर्धा, व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे.

### खर्दे येथे मानसिक आरोग्य कार्यशाळा

**शिरपूर ।** तालुक्यातील खर्दे बु. येथील आर. सी. पटेल विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य कार्यशाळा नुकतीच झाली. यावेळी धुळे जिल्हा रुग्णालय सायकॉलॉजिस्ट डॉ. जगदीश जिरे, जिल्हा समन्वयक डॉ. उमाकांत पाटील, प्राचार्य पी. व्ही. पाटील उपस्थित होते. डॉ. जिर यांनी मानसिक ताणतणाव कसा कमी करावा, मानसिक आरोग्य चांगले असेल तर विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यात कोणतेही ध्येय अशक्य नाही हे समजावून सांगितले.

# आपले सरकार सेवा केंद्रांद्वारे सर्व शासकीय सेवा ऑनलाईन

प्रतिनिधी । जळगाव



**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ राज्यात प्रभावीपणे अंमलात असून, या अधिनियमांतर्गत नागरिकांना विहित कालमर्यादेत लोकसेवा उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने लोकसेवा हक्क अधिनियमाखाली विविध सेवा अधिसूचित केल्या असून, त्या सेवा प्रभावीपणे व पारदर्शकपणे नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**

जळगाव जिल्ह्यातील ३५० ग्रामपंचायतीमध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सेवा पुरविण्यास सुरुवात झाली आहे.राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या *आपले सरकार सेवा केंद्रां*मार्फत ग्रामविकास विभागासह इतर विविध प्रशासकीय विभागांनी अधिसूचित केलेल्या सर्व ऑनलाईन लोकसेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यास तसेच त्या सेवांसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता ग्रामीण भागातील नागरिकांना विविध प्रमाणपत्रे, परवाने, दाखले व इतर शासकीय सेवांसाठी तालुका अथवा जिल्हा मुख्यालयात जाण्याची गरज भासणार नाही.

याशिवाय, नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज शुल्क स्वीकारण्यासाठी थरश्रश्रशीं सुविधा उपलब्ध करून देण्याचे तसेच सर्व शासकीय विभागांनी अधिसूचित केलेल्या ऑनलाईन सेवांचे अर्ज ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत स्वीकारून त्याची संगणकीय पावती नागरिकांना देण्याची कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश शासन निर्णयात देण्यात आले आहेत.

➤ या निर्णयानुसार सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींची आपले सरकार सेवा केंद्र यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे, तसेच जिल्ह्यातील NIC केंद्रामार्फत संबंधित ग्रामपंचायतींच्या नावे USER ID प्राप्त करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सेवांसाठी महा-आयटी महामंडळाकडून USER ID मिळविण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# बालकांनी मनमुराद खेळ खेळावेत : जिल्हाधिकारी विसपुते

## धुळ्यात चाचा नेहरू बाल महोत्सवाच्या उद्‌घाटनाप्रसंगी आवाहन

प्रतिनिधी । धुळे

महिला व बाल विकास विभागांतर्गत आयोजित चाचा नेहरू बाल महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व बालकांनी मनमुराद खेळ खेळावेत. भरपूर मनोरंजन करीत खेळाचा खरा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले.

महिला व बाल विकास विभागांतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी तसेच संस्थेबाहेरील मुलांसाठी आयोजित चाचा नेहरू बाल महोत्सव २०२५ मधील क्रीडा, चित्रकला व विविध स्पर्धांचे उद्धाटन जिल्हा क्रीडा संकुल, धुळे येथे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास नाशिक विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) चंद्रशेखर पगारे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र भामरे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ, जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील, जिल्हा परिविक्षा अधिकारी गिरीष जाधव, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. उषा साळुंखे, सदस्या ड. अनिता भांबेरे, सुरेखा पवार, आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, बालकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी खेळ, कला व सर्जनशील उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत. अशा उपक्रमांमुळे बालकांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे बाल महोत्सवात सर्व बालकांनी मनमुराद खेळ खेळावेत. जिल्हा परिविक्षा अधिकारी श्री. जाधव म्हणाले की, महिला व बाल विकास विभाग चाचा नेहरू बालमहोत्सव राबवित आहे.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार जिल्हा परिविक्षा अधिकारी गिरीष जाधव यांनी मानले, तर सूत्रसंचालन पूनम बेडसे यांनी केले.

# उपनगराध्यक्ष पंकज बोरोले पुन्हा ॲक्शनमोडवर

## रत्नदीप नगरातील समस्या काढल्या तडकाफडकी निकाली

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपालिका निवडणूक काही दिवसांपूर्वीच आटोपली असून खाते वाटपही कालच झाले आहे. तरीही कॉलनी परिसरात समस्यांनी त्रस्त असलेल्या नागरिकांना झटपट सेवा कशी देता येईल, यावर उपनगराध्यक्ष तथा नियोजन विकास सभापती पंकज बोरोले यांनी भर दिला. याचाच एक प्रसंग काल घडला. रत्नदीप नगरातील रहिवाशांची फोनवर रिंग वाजली अन् धावत जाऊन समस्येचे निराकरण करण्याचे पाऊल उपनगराध्यक्षांनी उचलले. सूर्य मावळेपर्यंत प्रॉब्लेम स्वॉल केल्याची माहिती नागरिकांनी दिली.**



२-४ दिवसांपूर्वी परिसपार्क येथील समस्यांबाबत पंकज बोरोले यांच्याकडे काही नागरिकांनी तक्रार केली असता कार्यालय वेळ संपलेली असतांना अधिकारी व कर्मचारी यांना थांबवून चर्चा करून संबंधीत तक्रारींचा प्रश्न तडकाफडकी तडीस नेला होता.

कालही शेडूल व्यस्त असताना सुद्धा उपनगराध्यक्ष पंकज बोरोले यांनी रत्नदीप नगर वासीयांची समस्या लक्षात घेऊन तत्काळ जागेवर येऊन पाहणी केली व संध्याकाळपर्यंत प्रश्न कायमचा मार्गी लावला.

> विशेष बाब म्हणजे संध्याकाळी स्वतः आठवण ठेवत कॉलनीवासींना भ्रमणध्वनीद्वारे विचारपूस करीत काम झाल्याचे खात्री करून घेतल्याने रहिवाशांत समाधानाची लहर उठली. यावरून सध्या तरी दबंग नगरसेवक म्हणून प्रभागवासियांनी नंबर वन दिल्याची चर्चा आहे.

# पारोळा पालिकेच्या आरोग्य सभापतिपदी डॉ.मंगेश तांबे यांची बिनविरोध निवड



प्रतिनिधी । पारोळा

**पारोळा नगरपरिषदेच्या स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी म्हणून डॉ. मंगेश तांबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**

याप्रसंगी पीठासीन अधिकारी डॉ. उल्हास देवरे, लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपनगराध्यक्ष रोहन मोरे, मुख्याधिकारी नेरकर त्याचप्रमाणे शिवसेनेचे गटनेते अमृत चौधरी, भारतीय जनता पार्टीच्या गटनेच्या अलका धीरज महाजन आणि सर्व लोकनियुक्त नगरसेवक, नगरसेविका बंधू-भगिनी उपस्थित होते. पुण्यापावन पारोळा नगरी स्वच्छ कशी ठेवता येईल व आरोग्यदायी कशी करता येईल, यासंदर्भात त्यांनी यावेळी म्हटले की सर्वांनी विश्वासाने दिलेली जबाबदारी पार पाडून शहरातील स्वच्छता व नागरिकांचे आरोग्य राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल व चांगल्यात चांगले काम कसे करता येईल, यासाठी प्रयत्नरत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## थोडक्यात

### शेतकऱ्याची शेत शिवारातून दुचाकी चोरी

**पारोळा ।** भोलाणे शेत शिवारातून एका शेतकऱ्याची अज्ञात चोरट्यांनी दुचाकी चोरी करून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. शेतकरी उत्तम रमेश करंजे हे दिनांक ९ रोजी रात्री साडेआठ वाजता आपल्या शेतात झोपण्यासाठी गेले होते. त्यांच्या दुचाकीची नंबर एमएच १९ सीडी ४०८० असलेली दुचाकी ते नेहमीप्रमाणे शेताजवळ लावून गेले होते. सकाळी उठल्यावर दुचाकी त्यांच्या लावलेल्या ठिकाणी दिसून आली नाही. त्यांनी शेताभोवती आणि परिसरात शोधाशोध केली, तरीही दुचाकी मिळाली नाही.

### मुक्ताईनगर विविध विषय समित्यांची स्थापना

**मुक्ताईनगर ।** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा विषय समितीच्या निवडणूक नियम १९६६ मधील नियम ३ नुसार मुक्ताईनगर नगरपंचायतीची विशेष सभा आज सोमवार रोजी नगरपंचायत सभागृहात पार पडली. या सभेत नगरपंचायतीच्या विविध विषय समित्यांची स्थापना करण्यात आली. स्थायी समितीच्या सभापतीपदी पदसिद्ध लोकनियुक्त नगराध्यक्ष संजना चंद्रकांत पाटील यांची निवड करण्यात आली. बांधकाम समितीच्या सभापतीपदी ताहेराबी लुकमान शेख, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी पदसिद्ध उपनगराध्यक्ष देवयानी निलेश शिरसाठ, पाणीपुरवठा भलभले यांची निवड झाली.

# पंकज विद्यालयात परीक्षेची भीती, ताण-तणावावर मार्गदर्शनपर व्याख्यान

प्रतिनिधी । चोपडा



**येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व गॅलक्सी कॉम्प्युटर चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता ९ ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.**

परीक्षेचा ताण- तणाव, भीती आणि करिअर कन्फ्युजन या विषयांवर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. मुंबई येथील प्रसिद्ध मार्गदर्शक ध्वनी शाह या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत परीक्षेचा ताण कसा कमी करावा, आत्मविश्वास कसा वाढवावा तसेच करिअर निवडीबाबत योग्य निर्णय कसा घ्यावा, याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व हेतू प्रीती शहा यांनी सादर केला. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात केवळ गुणांवर नव्हे तर आपल्या आवडीनिवडी, क्षमता व कौशल्यांचा विचार करून करिअरची निवड करावी, असे प्रतिपादन केले. परीक्षा हा जीवनाचा एक टप्पा असून अपयशाने खचून न जाता सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.अध्यक्षीय भाषणात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुरेश बोरोले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जो विद्यार्थ्यांचे हित चिंततो तोच खरा शिक्षक असे गौरवोद्गार चांगले कार्य करणाऱ्या शिक्षकांबाबत काढले. या कार्यक्रमास इयत्ता ९ वी ते १२ वी मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकवृंदाने शिस्तबद्ध नियोजन केले.

> उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मानसिक बळ मिळून त्यांच्या शैक्षणिक व करिअर वाटचालीस योग्य दिशा मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थित विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. या व्याख्यानाचा लाभ चोपडा तालुक्यातील सर्व शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक,पालक व हजारो विद्यार्थ्यांनी घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एन आर वाघ यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठीगॅलेक्सि कॉम्पुटर चोपडा व पंकज विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी प्रयत्न केले.

# धरणगाव पालिकेच्या स्थायी व विषय समित्यांची बिनविरोध निवड

## नगरपरिषदेत एकोप्याचे वातावरण, विकासाला गती देण्याचा निर्धार!

प्रतिनिधी । धरणगाव



**धरणगाव नगरपरिषदेच्या स्थायी समिती तसेच विविध विषय समित्यांच्या सभापती पदांची निवड प्रक्रिया नुकतीच शांततेत व सुरळीतपणे पार पडली. ही निवड प्रक्रिया पीठासन अधिकारी तथा तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली, मुख्याधिकारी अमोल बडगुजर व कार्यालयीन अधीक्षक भिकन पारधी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या निवड प्रक्रियेत नगरपरिषदेच्या स्थायी समितीच्या सभापतिपदी नगराध्यक्षा लीलाताई सुरेश चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच विविध विषय समित्यांच्या सभापती पदांवरही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.**



यामध्ये सार्वजनिक बांधकाम समिती - किशोर दौलत कंखरे, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती - प्रियंका चेतन जाधव, स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती - नितीन गजानन बयस, पाणीपुरवठा व जननिस्सारण समिती - सुरेखा विजय महाजन, नियोजन व विकास समिती - हाजी शेख इब्राहीम अब्दुल रसूल मोमीन, तर महिला व बालकल्याण समिती - मंदाकिनी ललित येवले यांची सभापतीपदी अधिकृतरीत्या बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान सर्व नगरसेवकांची उपस्थिती होती. कोणताही वाद अथवा मतभेद न होता सर्व पदांची निवड बिनविरोध झाल्याने नगरपरिषदेत एकोपा व सहकार्याचे वातावरण दिसून आले.

नवनिर्वाचित सभापतींनी नगरविकासाला प्राधान्य देत नागरिकांच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, नवनिर्वाचित सभापतींचे नगरसेवक, अधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे. या बिनविरोध निवडीमुळे धरणगाव शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा व गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# महिला क्रीडा मंडळातर्फे हळदीकुंकू कार्यक्रमात रोपवाटप

प्रतिनिधी । भुसावळ

**येथील महिला क्रीडा मंडळाच्या वतीने मकरसंक्रांतीनिमित्त पर्यावरण रक्षणाचा संदेश देत आगळावेगळा हळदीकुंकू कार्यक्रम रघुकुल कॉलनीतील सोन्या मारुती मंदिरात आयोजित करण्यात आला.**



या कार्यक्रमात महिलांना पारंपरिक वाणाऐवजी झाडांची रोपे देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला व पुढील वर्षी ज्यांचे रोप छान रूजले असेल त्यांना बक्षिसे देण्याचे मंडळातर्फे जाहीर करण्यात आले. सध्याच्या काळात वाढत चाललेले प्रदूषण, झाडांची तोड आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे व त्याचे संगोपन करावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. हळदीकुंकूच्या माध्यमातून महिलांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी दीपाली सराफ, भारती चौहान, माधुरी गव्हाळे, रश्मी ठोसर, अनिता सपकाळे, वैशाली बऱ्हाटे, स्मिता राऊळ यांची उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी महिला क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा आरती चौधरी, प्राची राणे, प्रभा पाटील, लता ढाके, प्रमिला राउळ, मंगला पाटील, किरण चौधरी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# रस्ते अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करा : सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्रद्धा महाजन

प्रतिनिधी । चोपडा




**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयात जळगाव येथील उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि मानसशास्त्र विभाग, मानसशास्त्र समुपदेशन केंद्र व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान उपक्रमांतर्गत मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात माजी शिक्षणमंत्री कै.अक्कासो.सौ. शरच्चंद्रिका सुरेश पाटील यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली.**

> यावेळी जळगाव येथील उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक श्रद्धा महाजन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, मसुरक्षेसाठी बचावात्मक उपाय करायला हवेत. सुरक्षेसाठी हेल्मेट चा वापर करणे गरजेचे आहे. वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवावे. नशेपासून दूर रहावे. सिग्नल वरील लाईटचा अर्थ समजून घ्यावा. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन केल्यास रस्त्यावरील अपघात टाळता येऊ शकतीलफ यावेळी त्यांनी सिग्नल वरील चिन्हांचा वापर, इमर्जन्सी एक्झिटचा वापर कसा करावा?हेल्मेट कसे वापरावे?याविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ हे उपस्थित होते. याप्रसंगी उपप्रादेशिक परिवहन विभाग जळगाव येथील मोटर वाहन निरीक्षक योगिता अत्तरदे, उपप्रादेशिक परिवहन विभाग जळगावच्या सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक श्रद्धा महाजन, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. बी.सूर्यवंशी, आरटीओ कर्मचारी परेश मराठे, राज मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक प्रवीण पाटील, डॉ.आर.आर. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. आर. पाटील यांनी रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी जळगाव येथील उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या मोटर वाहन निरीक्षक योगिता अत्तरदे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, रस्ते नियमांचे पालन करावे. आपले तसेच इतरांच्याही जीवनाचे रक्षण करण्यासाठी आपण स्वतः वाहतूक नियमांचे पालन करून जनजागृती करावी. याप्रसंगी महाविद्यालयाचे समन्वयक व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शैलेशकुमार वाघ अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, रस्ता सुरक्षा हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा भाग असून रस्ते अपघातात होणारे मृत्यू एक गंभीर समस्या आहे. अनेक अपघात हे सदोष मानवी चुकांमुळे होतात. आपल्यामुळे दुसऱ्यांचा जीव जाणार नाही, याची काळजी घेण्यासाठी नियमांचे पालन करावे. सुरक्षिततेसाठी जनजागृती प्रबोधन करणे गरजेचे आहे.

यावेळी रस्ते वाहतूक नियमांच्या संदर्भात अचूक उत्तरे देणाऱ्या मनीष माळी, शरद कुंभार, पूजा पाटील, हर्षल मराठे, सिद्धेश्वर परदेशी या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते हेल्मेट देऊन सन्मानित करण्यात आले.

# शाळेने मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर द्यावा : खा.उज्ज्वल निकम

## चिंधाबाई पाटील विद्यालयाच्या रौप्य महोत्सवाचे उद्घाटनप्रसंगी दिला सल्ला

प्रतिनिधी । चोपडा

**गुळीनदी परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, रुखनखेडा (प्र. चोपडा) संचलित आईसाहेब चिंधाबाई निंबाजी पाटील माध्यमिक विद्यालय, माचले ता. चोपडा यांच्या स्थापनेच्या २५ वर्षपूर्ती रौप्य महोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन पद्मश्री ॲड. उज्वल जी. निकम (खासदार, राज्यसभा, दिल्ली) यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुणभाई गुजराथी (माजी विधानसभा अध्यक्ष) हे होते.**



उद्घाटनप्रसंगी बोलताना पद्मश्री ॲड. उज्वल निकम यांनी ग्रामीण भागातील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत, या विद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडवले असल्याचे गौरवोद्गार काढले. भविष्यातही शाळेने शैक्षणिक प्रगतीसोबतच मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांनी शाळेच्या प्रगतीचा गौरव करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक संस्थेचे सचिव ॲड. घनश्याम पाटील यांनी केले तर माजी विद्यार्थी दिनेश ठाकूर शास्त्रज्ञ साऊथकोरिया व सधू बाविस्कर सहाय्यक कृषी अधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन ॲड. रुपेश पाटील यांनी केले. अरुण पाटील यांनी शाळेची पायाभरणी केली. त्यामुळे आणि २५ वर्षापासून प्रविण पाटील यांनी मुख्याध्यापक म्हणून चांगली कामगिरी केली. त्याबद्दल संस्थेकडून विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रविण निकम, उपाध्यक्ष जगन्नाथ पाटील, सचिव ॲड. घनश्याम पाटील संचालक हिरालाल पाटील, अशोक पाटील, डॉ. रवींद्र निकम, राजेंद्र पाटील, इंद्रभान पाटील, देवकीनंदन पाटील, हेमलाल पाटील, सिंधू पाटील, पंडित पाटील, खंडू पाटील, सतीश गुजर, ॲड. रुपेश घनश्याम, पाटील, कैलास पाटील, रोहित निकम, दिलीपराव सोनवणे, चंद्रहास गुजराथी, शांताराम पाटील, विजया पाटील, जीवनभाऊ चौधरी, विनायक रामदास चव्हाण, सौ इंदीराताई पाटील, प्रवीण गुजराथी, निलीमाताई पाटील, शशिकांत देवरे, सुनील जैन, नारायण शालिग्राम पाटील, गोकुळ पाटील, हितेंद्र देशमुख, शशिकांत पाटील, नंदकिशोर पाटील, डि. पी. पाटील, डॉ. मनोज सनेर, पांडुरंग सोनवणे, मिलिंद सोनवणे, सुनील पाटील, संतोष धोंडू पाटील, गोपाल महाजन, बाळासाहेब सोनवणे, आदी उपस्थित होते.